Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ३ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १५-२१, २०२६/पौष २५-माघ १ , शके १९४७ [पृष्ठे १९, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**सूचना**

क्रमांक प्रा.यो.यवत.-मौ.किन्ही, गट नं. १३७ व इतर-कलम-२०(३)-सभा क्र. ३१-२०२५-सहसंनरअम-०९-२०२६.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) मधील तरतुदीनुसार यवतमाळ जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास " उक्त प्रादेशिक योजना " असे संबोधले आहे) शासनाने दिनांक ०१ जानेवारी, २०१८ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ०२ मार्च, २०१८ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, उक्त प्रादेशिक योजनेअंतर्गत " किन्ही " विकास केंद्राचा (यापुढे " उक्त विकास केंद्र " असे संबोधिले आहे) प्रस्तावित जमीन वापर नकाशा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. डिटीपी-प्रायो-यवतमाळ-यवतमाळ ग्रोथ सेंटर नकाशे-टिपीव्ही-६-६१४०, दिनांक १३ डिसेंबर, २०१९ अन्वये मंजूर असून तो दिनांक ०७ मार्च, २०२० पासून अंमलात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे किन्ही, ता. जि. यवतमाळ येथील गट क्र. १३७ (पै.) १३८,१३९ व १४३, क्षेत्र एकूण १६.८५ हे. आर जमीन (यापुढे ज्यास " उक्त जमीन " असे संबोधले आहे) ही शेती विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपध्दती बाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस- १८१५-प्र. क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ०६ मे, २०१५ व दिनांक ०४ जानेवारी, २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास " उक्त शासन निर्णय " असे संबोधले आहे), व त्याअनुषंगाने शासनाने " प्रस्ताव छाननी समिती " गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार, उक्त जमिनी, (एकूण क्षेत्र १६.८५ हे. आर पैकी मोजणी नकाशानुसार रस्त्याखालील क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्र १६.५४ हे. आर), " शेती विभागातून " वगळून, खालील अटींच्या अधीन राहून, " रहिवास विभागात " समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे (यापुढे ज्यास " उक्त फेरबदल " असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत " प्रस्ताव छाननी समिती " चे मत झाले आहे;

**अटीः-**

(१) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद प्रमाणे प्रस्तुतच्या विभाग बदलासाठी आवश्यक ते अधिमूल्य व इतर शुल्क भरणा करणे अर्जदार/जमीन मालक /विकासकर्ते यांचे वर बंधनकारक राहील.

(२) दिनांक ०६ मे, २०१५ व ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निणर्यात व त्यासोबतच्या सहपत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार उक्त जमिनीचा विकास करणे बंधनकारक राहील.

(३) सदरची परवानगी म्हणजे मालकी हक्काबाबत प्रमाणिकरण नाही. उक्त जमिनींच्या मालकी हक्काबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार/जमीन मालक/ विकासकर्ते हे जबाबदार राहतील.

(४) उक्त जमिनींचे कोणत्याही क्षेत्रावर विकसन करताना, मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील प्रादेशिक योजनेसाठीचे तरतुदीनुसार,किमान १०% मनोरंजनात्मक खुली जागा व किमान १०% सुविधा क्षेत्र सोडणे बंधनकारक राहील.

(५) फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा अर्जदार/जमीन मालकांनी/ विकास कर्त्यांनी स्वतःच्या खर्चाने विकसित करणे व पुरविणे बंधनकारक राहील.तसेच, उक्त जमिनीचे विकसन करताना व विकास पश्चात तेथील पाणीपुरवठा,सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

(६) अद्ययावत STP, Rainwater Harvesting, Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर) व Solar Energy अशा स्वरुपाच्या संकल्पना उक्त जमिनीचे विकसन करतांना अंमलात आणण्यात याव्यात.

(७) उक्त जमिनीवर अर्जदार/जमीन मालक/ विकसनकर्ते यांनी जागेचे विकसन करतांना प्रती हेक्टरी २५० वृक्ष लावणे बंधनकारक राहील. सदरची बाब विकसनास अंतिम मंजुरी देतांना पडताळणी करण्यात यावी.

(८) उक्त जमिनीपैकी ग. क्र. १४३ चे मोजणी नकाशावरील नोंदीनुसार पुर्वेकडील गटातील जमीन तलावासाठी संपादित केल्याचे दिसून येते. सबब प्रस्तुत जमिनीच्या विकासाचे वेळी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ३.१.१२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

(९) उक्त जमिनीवरील अभिन्यासातील भूखंड/सदनिका यांची विक्री खालील तक्तानुसार करणे बंधनकारक राहील.—

**तक्ता**

**अभिन्यासातील भूखंड/सदनिका यांची सुविधांच्या विकसनाची सांगड**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर | . . | एकूण २५% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ५०% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ७५% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ९०% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण १००% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

(१०) फेरबदलाखालील जमिनी मध्ये समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर , जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी विहित केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय विकासकर्ते यांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

(११) प्रस्तावांर्गत जमिनींपैकी गट नं . १३९ (पै.) व गट नं. १३८ (पै.) चे क्षेत्रामध्ये १:५ पेक्षा तीव्र उतार असलेल्या जमिनीवर कोणत्याही स्वरुपाचे विकसन अनुज्ञेय होणार नाही. प्रस्तावाखालील जागेचे विकसन करतांना क्षेत्रांतर्गत जागेची नैसर्गिक भूपृष्ठीय रचना, कंटूर या बाबी विचारात घेऊन अभिन्यासाची व त्या अंतर्गत रस्त्यांची आखणी नियोजित करणे आवश्यक राहील.

(१२) कलम २० (४) ची अधिसूचना निर्गमित करणेस मान्यता मिळालेपासून एक वर्षाचे आत अधिमूल्याची रक्कम न भरलेस सदर क्षेत्र फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करणेत येईल.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १५१ पोट-कलम (१) अन्वये निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र ४९-१५-नवि-१३, दिनांक ११ जून, २०१५ नुसार कलम २०(२), २०(३) व २०(४) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम (३) अन्वये, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती उक्त प्रादेशिक योजनेत उक्त फेरबदल करण्याचा हेतू या सूचनेद्वारे घोषीत करीत आहेत आणि त्याकरिता

उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत फेरबदलाबाबत विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांना “अधिकारी ” म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. हरकती/सूचना सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात. “अधिकारी ” यांनी वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर करावा.
०२) सदरची सूचना व प्रस्तवित फेरबदल दर्शविणारा नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, “ निलगिरी ” डॉ. अग्रवाल यांची ईमारत, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती.

(२) सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ.
(०३) प्रस्तुत सुचना **www.dtp.maharashtra.gov.in (Division Offices)** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ओवैस ए. मोमीन,**
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा
सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग,
अमरावती.

अमरावती :
दिनांक ८ जानेवारी, २०२६.

---

भाग १-अ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ६.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*NOTICE*

No. R.P.Yavt.-Mou. Kinhi, Gut No.137 & others-Sec-20(3)-Meeting No. 31-2025-JDTPAMT-09-2026.—

Whereas, the Government has sanctioned the Regional Plan for Yavatmal District on 1st January, 2018 (hereinafter referred to as " the said Regional Plan") under the provisions of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and has came into force with effect from 2nd March, 2018. Also the proposed land use plan of Kinhi Growth Centre (hereinafter referred to as the "said Growth Centre") within the said Regional Plan has been sanctioned by Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. DTP-RP-Yavatmal-Yavatmal Growth Centre Plans-TPV-6-6140, dated 13th December, 2019 and has came into force with effect from 7th March, 2020;

And whereas, in the said Regional Plan, the land Admeasuring Area 16.85 H.A, bearing Gut Nos. 137(Part),138, 139 & 143 of Mouje Kinhi, Tal. Dist. Yavatmal, (hereinafter referred to as the "said land") is included in Agricultural Zone;

And whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815-C.R. 49-15-UD-13, dated 6th May, 2015 and dated 4th January, 2016 (hereinafter referred to as "the said Government Resolution") has issued the directives under section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans and for that purpose constituted "Proposal Scrutiny Committee";

And whereas; the "Proposal Scrutiny Committee" constituted under the said Government Resolution, is of the opinion that, the said land (Remaining 16.54 H.A. Area excluding Road as per measurement plan from the total Area 16.85 H.A.) shall be deleted from "Agriculture Zone" and proposed to be included in "Residential Zone" and accordingly it is necessary to modify the said Regional Plan (hereinafter referred to as "the said modification") in accordance with the provisions of sub-section *(2)* of section 20 of the said Act, subject to the following Conditions;

*Conditions:*

(1) It shall be binding on the Applicant /Land Owner/Developer to Pay Premium and other necessary charges as decided by the Government Resolution dated 04th January 2016.

(2) It shall be binding to develop the said land as per the guidenlines mentioned in Government Resolutions dated 06th May, 2015 and 04th January , 2016. and Annexures with it.

(3) This permission does not confirm ownership of the said land. The Applicant/Land Owner/ Developer will be completely responsible regarding any issue about ownership of the said land.

(4) While developing any portion of area of the said lands, it shall be binding to provide at least 10% open space and 10% amenity area as per the Regulations for Regional Plan in the approved Unified Development Control and Promotion Rules (UDCPR).

(5) It shall be mandatory for the Applicant/Land owner/Developer to develop and provide infrastructure at their own expense. Applicant/Land owner/Developer shall make necessary self contained arrangements to provide Water supply, Waste water treatment, Solid waste disposal/Management while developing & after development of the said land at his own cost.

(6) The concepts like STP, Rainwater Harvesting, Water Recycling and Solar energy shall be implemented while developing the said land.

(7) It shall be binding on Applicant/Land owner/Developer to plant 250 trees per Hect. This shall be verified at the time of final sanction to development permission.

(8) As per the records on the measurement sheet of Gut No. 143 it is seen that, the land in the Eastern Gut No. has been acquired for a lake. It will be mandatory to *abide* by the provisions of Rule No. 3.1.12 of the Unified Development Control and Promotion Regulations at the time of development of the said land.

(9) It shall be binding to sale layout plots/flats of the said land as per table given below.

*TABLE*

**Corelation of layout plots/flats with development of basic infrastructure**

| | | |
|---|---|---|
| (A) | After sanction final layout | Sale of 25% of the total plots/flats shall be permissible. |
| (B) | After approximate 40% development of basic infrastructure | Sale of 50% of the total plots/flats shall be permissible. |
| (C) | After approximate 60% development of basic infrastructure | Sale of 75% of the total plots/flats shall be permissible. |
| (D) | After approximate 80% development of basic infrastructure | Sale of 90% of the total plots/flats shall be permissible. |
| (E) | After approximate100% development of basic infrastructure | Sale of 100% of the total plots/flats shall be permissible. |

(10) If the Group Housing Scheme is proposed in the layout, then, Occupancy Certificate shall not be issued unless all basic amenities are fully developed in the said land.

(11) No development of any kind will be permitted on the land having a slope steeper than 1:5 in the area of Gut No. 139 (P) and Gut No. 138 (P) among the lands under the proposal and in land which is not suitable for construction. The development of land regarding the internal roads is to be done according to natural geography of the land, contour *etc.*

(12) If the premium amount is not paid within one year from the date of approval for issuing the notification under section 20*(4)*, the said modification proposal will be rejected.;

And whereas, as per the provision of sub-section *(1)* of section 151 of the said Act, the Government *vide* Notification No. TPS-1815-CR-49-15-UD-13, dated 11th June, 2015 has delegated the powers under section 20 *(2)*, 20*(3)* & 20*(4)* of the said Act to the concerned Joint Director of Town Planning;

Now, therefore, in exercise of the powers delegated by the Government in this regard, as per section 20 *(3)* of the said Act, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati; by this notice, declares intention to make the said modification in the said Regional Plan and for the said

proposed modification invites suggestions/objections from the public in writing, within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette.

Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal is appointed as the "Officer" to hear the suggestions/objections in respect of the said modification, received within the stipulated period. The suggestions/objections shall be addressed to the Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal, Administrative Building, Ground Floor, Collector Office Premises, Yavatmal. The officer shall submit the report to the Member Secretary, after completing legal procedure.

02) The said notice and the plan showing the proposed modifications shall be available for inspection by the general public during office hours at the following offices for a period of 30 days.

(1) The Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati, "Nilgiri" Dr. Agarwal Building, Congress Nagar Road, Amravati.

(2) The Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal, Administrative Building, Ground Floor, Collector Office Premises, Yavatmal.

03) This Noticeis also available on website *www.dtp.maharashtra.gov.in (Division Offices).*

OWAIS A. MOMIN,
Member Secretary, Proposal Scrutiny Committee
And
Joint Director of Town Planning,
Amravati Division, Amravati.

Amravati :
Dated the 8th January, 2026.

---

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ७.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**वणी शहराच्या (वाढीव हद्दीची) प्रारुप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण**

### सूचना

क्रमांक नपव-नि.वि.-२०९३-२०२६.—

ज्याअर्थी, वणी नगर परिषद नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) नुसार प्रारुप विकास योजना, वणी (वा. ह.) दिनांक २५ जून, २०२५ चे सूचनेव्दारे नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण प्राधिकृत प्रकाशन अमरावती विभागीय पुरवणी भाग एक-अ, मध्ये दिनांक ३० जून, २०२५ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सादर केला;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने तो अंशतः मान्य करुन व नव्याने बदल सुचवून, उक्त योजनेत फेरबदल/बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्रमांक ०१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल/बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आह;

त्याअर्थी, आता उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदलांची सुची परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट- " अ "**

**अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबल/ बदलांची सूची**

| अ.क्र. | फेरबदल/बदल क्रमांक | फेरबदल/बदलांचा तपशील |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **एम १** | मौजे वणी, सर्वे नं.५४ वरील आरक्षण क्र. ०४ माध्यमिक शाळाचे आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| २ | **एम २** | मौजे वणी, सर्वे नं. ५७ मधून जाणारा १५ मी. रुंद विकास योजना रस्ता (दक्षिणे कडून उत्तरेकडे जाणारा) वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ३ | **एम ३** | मौजे वणी, सर्वे नं. ५७ वरील आरक्षण क्र. ०३, माध्यमिक शाळाचे व खेळाचे मैदान आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ४ | **एम ४** | मौजे वणी, सर्वे नं. ४९ वरिल आरक्षण क्र. १६ वाहनतळ (पार्किंग) आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ५ | **एम ५** | मौजे वणी, सर्वे नं.४९ वरील बस टर्मिनल हे नामकरण बदलून त्याऐवजी खाजगी वाहनतळ (प्रायवेट पार्किंग) असे नामकरण करण्यात येत आहे. |
| ६ | **एम ६** | सर्वे नं. ८८ मध्ये दर्शविण्यात आलेले तळे (पॉन्ड) वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ७ | **एम ७** | मौजे वणी, सर्वे नं. १०२ (१४१) वरील आरक्षण क्र. ३२, प्राथमिक शाळाचे आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ८ | **एम ८** | मौजे वणी, सर्वे नं. १०२ (१४१) मध्ये दर्शविण्यात आलेले औद्योगिक विभाग वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ९ | **एम ९** | मौजे वणी, सर्वे नं. १०२ (१४१) व ११२ च्या सीमेवर दर्शविण्यात आलेला २४ मी. रुंद विकास आराखडा रस्ता वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| १० | **एम १०** | मौजे वणी, सर्वे नं.१०८ वरील आरक्षण क्र. ३७, बगीचा आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| ११ | **एम ११** | मौजे वणी, सर्वे नं.१०८ च्या ईशान्य कोपऱ्या मध्ये (निर्गुडा नदी लगत) नवीन आरक्षण क्र. ४६, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले. |
| १२ | **एम १२** | मौजे वणी, सर्वे नं.१२० व १२१ मधील आरक्षण क्र. ४२ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चे उद्देश बदलून आरक्षण क्र. ४२, नगर परिषदे करिता (म्यूनिसिपल पर्पस) चे आरक्षण करण्यात येत आहे. |
| १३ | **एम १३** | मौजे वणी, सर्वे नं.१२२ च्या उत्तरे कडील भाग रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. |
| १४ | **एम १४** | मौजे वणी, सर्वे नं.१२२ च्या उत्तरे कडील भागात १२ मी. रुंद विकास आराखडा रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. |
| १५ | **एम १५** | मौजे वणी, सर्वे नं.१२२ मध्ये नवीन आरक्षण क्र. ४७, खेळाचे मैदान व बगीचा चे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे. (प्रस्तावित १२ मी. रुंद विकास आराखडा रस्त्याच्या दक्षिणेकडील). |
| १६ | **एम १६** | मौजे वणी, सर्वे नं.१२२ चा उर्वरित भाग रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. (खेळाचे मैदान व बगीच्या आरक्षणाच्या दक्षिणेकडील जागा). |
| १७ | **एम १७** | मौजे वणी, सर्वे नं.१२३ मधील संपूर्ण क्षेत्र रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात आला. |
| १८ | **एम १८** | मौजे वणी, सर्वे नं.१२४ च्या उत्तरे कडील भागात १२ मी. रुंद विकास आराखडा रस्ता प्रस्तावित करण्यात आला. (इलेक्ट्रिक टॉवर लाइन च्या उत्तरे कडील बाजूस). |
| १९ | **एम १९** | मौजे वणी, सर्वे नं.१२४ (पैकी) च्या उत्तरे कडील भाग रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात आला. (प्रस्तावित १२ मी. रुंद विकास आराखडा रस्त्या कडील उत्तर बाजू). |
| २० | **एम २०** | मौजे वणी, सर्वे नं. ०५ वरील आरक्षण क्र. ३५, व्हेजीटेबल मार्केट (भाजी मार्केट) आरक्षण वगळण्यात आले. व ही जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली. |
| २१ | **एम २१** | मौजे वणी, सर्वे नं.१३५ मध्ये दर्शिविण्यात आलेले सार्वजनिक-निम सार्वजनिक विभागामधील जागा वगळण्यात आली. व ही जागा रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात आली. |

सदर फेरबदल/बदल दर्शविणारा उक्त प्रारुप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसाच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

(१) मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी.

(२) सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ.

**सचिन गाडे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वणी.

वणी :
दिनांक ०५ जानेवारी , २०२६.

---

भाग १-अ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ८.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

Publication of list Modifications/Changes in Draft Development Plan of Wani (Extended Boundary) u/s 28 *(4)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

*NOTICE*

No. MCW-P.D.-2094-2026.—

Whereas, Wani Municipal Council, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Wani (Extended Boundary) u/s 26 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 *vide* notice dated 25th June, 2025 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Amravati Division (Extra- ordinary), Supplement Part One-A, dated 30 June, 2025;

And whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted u/s 28 *(4)* of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on 29th October, 2025;

And whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee, partly accepted it and suggested changes in it and passed ResolutionNo. 01, dated 31ST October, 2025 to make modifications/changes to the said Plan and to submit the said Plan for sanction to the Government u/s 30 of the said Act;

And whereas, it is necessary to publish the said modifications/changes made in the said Plan for inspection of the public as per section 28*(4)* of the said Act;

Now,therfore, the list of modifications/changes made u/s 28*(4)* of the Act, by the said Planning Authority is hereby published as Appendix-"A"as per the provisions of said Act for information of the public;

*Appendix - "A"*

List of Modifications/Changes made u/s 28*(4)* of the Act

| Sr. No. | Modificationu No. | Details of modifications/changes |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | **M1** | Reservation No.04 of Secondary school in Survey No.54 of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |
| 2 | **M2** | 15 M Wide D.P. Road passing through Survey No. 57 of mauza Wani (South to North) is deleted and area included in Residential Zone. |
| `3 | **M3** | Reservation No.03 of Secondary school and Playground in Survey No.57 of mauza Wani is deleted and area included in Residential zone. |
| 4 | **M4** | Reservation No.16 of Parking in Survey No. 49 of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |

APPENDIX- *"A"-Contd.*

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| 5 | **M5** | Nomenclature of Bus Terminal shown in Survey No.49 of mauza Wani is deleted and Renamed as Private Parking. |
| 6 | **M6** | Pond shown in Survey No. 88 is deleted and area included in Residential Zone. |
| 7 | **M7** | Reservation No.32 of Primary school in Survey No.102(141) of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |
| 8 | **M8** | Industrial Zone (M.F.) shown in Survey No.102(141) of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |
| 9 | **M9** | 24 M Wide D.P. Road on boundary of Survey No. 102 (141) and 112 of mauza Wani is deleted and ared included in Residential Zone. |
| 10 | **M10** | Reservation No.37 of Garden in Survey No. 108 of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |
| 11 | **M11** | New Reservation No.46 of Sewage Treatment Plant (STP) is proposed in North-East corner of Survey No.108 of mauza Wani (Adjacent to Nirguda River) |
| 12 | **M12** | Purpose of Reservation No.42 of Sewage Treatment Plant (STP) in Survey No. 120 and 121 of mauza-wani is changed and proposed as Reservation No.42 Municipal Purpose. |
| 13 | **M13** | North side of Survey No 122 of mauza Wani is included in Residential Zone. |
| 14 | **M14** | New 12M wide D.P. Road is purposed in north side of Survey No. 122 of mauza Wani. |
| 15 | **M15** | New Reservation No. 47 of Play Ground and Garden is purposed in Survey No.122 of mauza Wani. (South side of 12M wide purposed D.P. Road) |
| 16 | **M16** | Remaining Area of Survey No. 122 of mauza Wani is included in Residential Zone (South side of Reservation of Playground and Garden). |
| 17 | **M17** | Whole Area of Survey No. 123 mauza Wani is included in Residential Zone. |
| 18 | **M18** | New 12 M wide D.P. Road is proposed in Survey No.124 of mauza Wani. (North side of Electric Tower line). |
| 19 | **M19** | Area of North side of Survey No. 124 (Partly) mauza Wani is included in Residential Zone. (North side of proposed 12M wide D.P. Road). |
| 20 | **M20** | Reservation No. 35 of Vegetable Market in Survey No. 05 of mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |
| 21 | **M21** | Public-Semi Public Zone in Survey No.135 mauza Wani is deleted and area included in Residential Zone. |

The said Draft Development Plan showing the modifications / changes is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days.

(1) Chief Officer, Municipal Council, Wani.

(2) Assistant Director, Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal.

SACHIN GADE,
Chief Officer,
Municipal Council, Wani.

Wani
Dated the 05th January, 2026.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिध्द झालेल्या आहेत.**

---

**९**

---

**शनिवार, मे २४, २०२५/ज्येष्ठ ३, शके १९४७**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०.

**प्राधिकृत अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

**एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१(i) चे तरतुदींना अनुसरून उक्त अधिनियमातील कलम २०(३) चे तरतुदींनुसार सूचना**

**सूचना**

क्रमांक ए. वि. नि. व. प्रो नि. विनियम क्र. ५.१.१(i)-कलम-२०(३)-सूचना-ससंनर-अम-७१५-२०२५.—

ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापूढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) नुसार महाराष्ट्र राज्यातील विविध प्रदेशांसाठी प्रादेशिक योजना मंजूर केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(ग) व २०(४) मधील तरतुदींनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८-प्र.क्र.-२३६-१८डिपी व आरपी कलम-३७(१कक) (ग) व २०(४)-नवि-१३, दिनांक २ डिसेंबर, २०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली महाराष्ट्र राज्याकरीता (काही अपवाद वगळता) मंजूर केली असून, दिनांक ३ डिसेंबर, २०२० पासून अंमलात आलेली आहे व ती प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू आहे. (यापूढे "उक्त नियमावली" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, सदर नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदींनुसार महानगरपालिकेच्या हद्दीपासून २.० कि.मी., नगर परिषदेच्या हद्दीपासून १.० कि.मी. आणि नगर पंचायतीच्या हद्दीपासून ०.५० कि.मी. अंतरावरील प्रादेशिक योजनेचे क्षेत्रामध्ये, जिथे प्रादेशिक योजनेत झोन नकाशे तयार केलेले आहेत किंवा तयार केलेले नाहीत, अशा क्षेत्रांसाठी योग्य रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे तयार करणेचे आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदींनुसार प्रादेशिक योजना क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) चे तरतुदीनुसारची कार्यवाही पूर्ण करणेकरीता शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन आदेश

क्र. टिपीएस-१८२०-१४-प्र.क्र.७९-२०२१-नवि-१३, दिनांक २७ मार्च, २०२५ अन्वये उक्त अधिनयमाच्या कलम १५४ चे तरतुदीनुसार दिलेल्या शासन निदेशान्वये अमरावती जिल्ह्याचे सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती यांना अधिकार प्रत्यायोजित करण्यात आलेले आहे.

आणि त्याअर्थी, आता, सदर सूचनेशी संलग्न परिशिष्ट-" अ " नुसारच्या उक्त परिघस्त क्षेत्रातील प्रारुप रस्त्यांच्या नकाशांचे प्रसिध्दीकरण करणे व त्याअनुषंगाने ३० दिवसांचे विहित मुदतीत नागरिकांच्या प्राप्त सूचना व हरकती यावर सुनावणी घेणे आवश्यक असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) च्या तरतुदीन्वये सदरहू सूचना प्रसिध्द करण्यात येत आहेत.

## परिशिष्ट – " अ "

## रस्त्याचे जाळ्यांचे नकाश आणि समाविष्ट गावे

| अ. क्र. | परिगणीत क्षेत्रातील प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे | स्तंभ " ब " मधील महानगरपालिका/ नगर परिषद/नगर च्या हद्दीपासूनचे अंतर | समाविष्ट मौजे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | अमरावती महानगरपालिका | २.०० कि.मी. | तालुका अमरावती :-<br>१) कठोरा बु. (भागशः), २) हिरापूर (भागशः), ३) रेवसा (भागशः), ४) चांगापूर, ५) रामगाव (भागशः), ६) नागापूर (भागशः), ७) वाळकी (भागशः), ८) बोरगाव धर्माळे, ९) वडगाव माहोरे, १०) वडुरा (भागशः), ११) राजुरा (भागशः), १२) मासोद (भागशः), १३) सुकळी (भागशः), १४) रसुलपूर (भागशः), १५) वनारसी (भागशः), १६) मलकापूर (भागशः), १७) लोणटेक (भागशः), १८) चांदुरी (भागशः), १९) पिंप्री, २०) इंदला (भागशः), २१) भानखेडा खु. (भागशः), २२) माळेगाव, २३) टाकळी खु., २४) वडद (भागशः), २५) अलियाबाद (भागशः), २६) म्हसला, २७) निंभोरा लाहे बु. (भागशः), २८) अंजनगाव बारी (भागशः), २९) गोविंदपूर (भागशः), ३०) मोरांगना (भागशः), ३१) नांदुरा बु. (भागशः), ३२) देगांव (भागशः), ३३) काटआमला (भागशः), ३४) नांदगाव पेठ (भागशः), ३५) सुलतानपूर, ३६) देवगिरी, ३७) मधलाबाद, ३८) वरवाड (भागशः), ३९) कामुंजा (भागशः).<br>तालुका नांदगाव खंडेश्वर :-<br>१) दाभा (भागशः), २) पाळा (भागशः), ३) दुर्गापूर (भागशः), ४) निभोरा (भागशः).<br>तालुका भातकुली :-<br>१) बोरगांव (भागशः). |
| २. | अचलपूर नगर परिषद | १.०० कि.मी. | १) अंबाडकंडारी (भागशः), २) औरंगपूर (भागशः), ३) धोतरखेडा (भागशः), ४) गौलखेडा (भागशः), ५) कांडली (भागशः), ६) खंजीरपूर (भागशः), ७) खेलबगाड (भागशः), ८) खेलबारी (भागशः), ९) खेलभालेराव (भागशः), १०) खेलदेवमाळी (भागशः), ११) खेलमट (भागशः), १२) वडुरा (भागशः), १३) खेलतपमाळी (भागशः), १४) खेलटेकाड (भागशः), १५) खेल त्र्यंबकनारायण (भागशः), १६) खोजनपूर (भागशः), १७) कुंभी (भागशः), १८) नारायणपूर (भागशः), १९) नरसाळा (भागशः), २०) नौबाग (भागशः), २१) रायपूरा (भागशः), २२) खामगाव (भागशः), २३) सालेबाद (भागशः), २४) शेकापूर (भागशः), २५) विरखेड (भागशः), २६) निजामपूर (भागशः), २७) रहिमपूर (भागशः). |

परिशिष्ट – " अ "—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३. | धामणगाव रेल्वे नगर परिषद | १.०० कि.मी. | १) हिरापूर (भागशः), २) जळगाव आर्वी (भागशः), ३) दत्तापूर, ४) नारगावंडी, ५) दत्तापूर (भागशः), ६) परसोडी (भागशः), ७) धामणगाव (भागशः), ८) मिर्झापूर (भागशः). |
| ४. | चांदूर बाजार नगर परिषद | १.०० कि.मी. | १) अब्दलपूर (भागशः), २) बोरज (भागशः), ३) नानोरी (भागशः), ४) दिलावलपूर (भागशः), ५) रशिदपूर (भागशः), ६) जमापूर (भागशः), ७) शिरजगाव बंड (भागशः), ८) प्रल्हादपूर (भागशः), ९) परसोडा (भागशः), १०) इमामपूर (भागशः). |
| ५. | चांदूर रेल्वे नगर परिषद | १.०० कि.मी. | १) मांजरखेड (भागशः), २) शिवणी (भागशः), ३) सोनगाव (भागशः), ४) राजना (भागशः), ५) तूळजापूर (भागशः), ६) शिरजगाव (भागशः), ७) नेकनामपूर, ८) चांदूर रेल्वे (भागशः). |
| ६. | मोर्शी नगर परिषद | १.०० कि.मी. | १) दुर्गवाडा (भागशः), २) येरला (भागशः), ३) सहादतपूर (भागशः), ४) मनीमपूर, ५) कोपरा (भागशः), ६) अहमदपूर (भागशः), ७) मोर्शी (भागशः). |
| ७. | दर्यापूर नगर परिषद | १.०० कि.मी. | १) दर्यापूर (भागशः), २) चांदूर (भागशः), ३) कापसी (भागशः), ४) पेठ इतबारपूर (भागशः), ५) जहाणपूर, ६) थिलोरी (भागशः), ७) लोधीपूर, ८) गायवाडी (भागशः), ९) गणेशपूर, १०) बाभळी (भागशः), ११) शिवर बु., १२) शिवर खु., १३) बनोसा (भागशः), १४) मुस्तुफापूर (भागशः). |
| ८. | वरूड नगर परिषद | १.०० कि.मी. | १) वाई बु. (भागशः), २) शेंदुरजनाघाट, ३) मालखेड (भागशः), ४) पार्डी (भागशः), ५) रोशनखेड (भागशः), ६) शिरपूर (भागशः), ७) पिंपळखुटा (भागशः) ८) मिलनपूर (भागशः), ९) जरूड (भागशः), १०) शहापूर (भागशः), ११) महापूर (भागशः), १२) टेंभूरखेड (भागशः), १३) अंतरखोप (भागशः), १४) भानडोली (भागशः), १५) कुएळी (भागशः), १६) दायवाळी (भागशः). |
| ९. | शेंदुरजनाघाट नगर परिषद | १.०० कि.मी. | १) सतनूर (भागशः), २) खेडी (भागशः), ३) जामतळा (भागशः), ४) मालखेड (भागशः), ५) वरूड (भागशः), ६) अंतरखोप (भागशः), ७) तिवसा (भागशः), ८) मोकविहीर (भागशः), ९) वाई बु. (भागशः), १०) रावडे (भागशः), ११) पुसली (भागशः). |
| १०. | अंजनगाव सुर्जी नगर परिषद | १.०० कि.मी. | १) अहमदपूर (भागशः), २) ऐवजपूर (भागशः), ३) अजितपूर (भागशः), ४) अलीपूर (भागशः), ५) अंजनगाव सूर्जी (भागशः), ६) खेलहाडोळ (भागशः), ७) जेठमलपूर (भागशः), ८) खेलबाबुजी (भागशः), ९) खेलहाडोळ (भागशः), १०) खेलहिराजी (भागशः), ११) खेलकोकाट (भागशः), १२) मोहब्बतपूर (भागशः), १३) शहापूर (भागशः), १४) सुर्जी (भागशः), १५) टाकरखेडा मोरे (भागशः), १६) शिरजगाव (भागशः), १७) खेल हातोड (भागशः). |
| ११ | धारणी नगर पंचायत | ०.५० कि.मी. | १) टिंगरीया (भागशः), २) कुसुमकोट (बु.) (भागशः), ३) कुसुमकोट (खु.) (भागशः), ४) मांडवा (भागशः), ५) बासपाणी (भागशः), ६) तलई (भागशः), ७) टाकरखेडा (भागशः). |

**परिशिष्ट – " अ "**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| १२ | भातकुली नगर पंचायत | ०.५० कि.मी. | १) नवथळ खु. (भागशः), २) बोरखाडी खु. (भागशः), ३) हरतोडी (भागशः), ४) हरतडा (भागशः), ५) सायत (भागशः), ६) चाकुर (भागशः), ७) गणोरी (भागशः), ८) गौलखेड बु. (भागशः), ९) निंभा (भागशः), १०) वासेवाडी (भागशः), ११) बोनेवाडी (भागशः), १२) सारबुलनदपूर (भागशः), १३) थेटखेड (भागशः), १४) गोविंदपूर, १५) जानेवाडी (भागशः), १६) चेचारवाडी (भागशः), १७) ढोलेवाडी (भागशः), १८) कृष्णापूर (भागशः), १९) दलालखेड (भागशः). |
| १३ | नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत | ०.५० कि.मी. | १) शिरपुर (भागशः), २) मोखड (भागशः), ३) मिर्झापूर (भागशः), ४) सातरगाव (भागशः), ५) कंझार (भागशः), ६) शहापूर (भागशः), ७) बच्चरपूर (भागशः), ८) फुबगाव (भागशः), ९) शिवणी (भागशः), १०) संग्रामपूर (भागशः), ११) पहुर (भागशः), १२) धरवाडी (भागशः), १३) चिंचोल (भागशः), १४ येणस (भागशः). |
| १४ | तिवसा नगर पंचायत | ०.५० | १) चांदुर (भागशः), २) इसापूर (भागशः), ३) ममदापूर (भागशः), ४) काटसुर (भागशः), ५) सातरगांव (भागशः), ६) सारसी (भागशः), ७) विंचोरी (भागशः), ८) तळेगाव (भागशः), ९) शेंदुरजना बु. (भागशः), १०) डेहनी (भागशः), ११) निंभोरा (भागशः), १२) सुरवाडी खु. (भागशः), १३) सुरवाडी बु. (भागशः). |
| १५ | पुलगाव नगर परिषद, जिल्हा वर्धा लगतच्या तालुका धामणगाव, जि. अमरावती मधील क्षेत्रातील गावे | १.०० कि.मी. | १) गिरोली (भागशः), २) विटाला (भागशः), ३) व्यंकनाथ (भागशः). |

उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांच्या अनुषंगाने नागरीकांच्या काही सूचना / हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रासिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती या कार्यालयाकडे लेखी स्वरूपात पाठवाव्यात, सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे नागरीकांच्या अवलोकनार्थ सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती या कार्यालयात सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, तट्टे इमारत, डॉड कंपाऊंड, कॅम्प, अमरावती या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे व तपशील योग्य शुल्क आकारुन सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**न. म. बोबडे,**
प्राधिकृत अधिकारी तथा
सहायक संचालक, नगर रचना,
शाखा कार्यालय, अमरावती.

अमरावती :
दिनांक २० मे, २०२५.

भाग १ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१.

BY AUTHORIZED OFFICER AND ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

**Notice under the provisions of section 20*(3)* of the said Act in pursuance with the provisions of the Regulation No.5.1.1 *(i)* of the Unified Development Control & Promotion Regulation**

*NOTICE*

NO. U.D.C. & P. R. NO. 5.1.1 (i) Section 20 (3)-Notice-ADTP-Amravati-715-2025.–

Whereas, the State Government has sanctioned the Regional Plans for various Regions in Maharashtra State as per the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act');

And whereas, the Unified Development Control and Promotion Regulations for Maharashtra State (with some exceptions) has been sanctioned under the provisions of section 37*(1AA) (C)* & 20*(4)* of the said Act, by the Govrnment in Urban Development Department *vide* Notification No.TPS-1818-CR-236-18-DP & RP-Sec.37 (1AA) (C) & 20(4)-UD-13, dated 02nd December, 2020 and come into force with effect from dated 03rd December, 2020 and it is applicable for the area under Regional Plans (hereinafter referred to as 'the said Regulation');

And whereas, as per the provisions of Regulation No.5.1.1 of the said Regulations, the areas in Regional Plan within a belt of 2 k.m. from the boundaries of Municipal Corporation, 1.0 k.m. from the boundaries Municipal Council & 0.5 k.m. from the boundaries of Nagar Panchayat, where zone plans are prepared or not prepared, appropriate Road Network Plans to be prepared for such areas;

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of said Regulations, the Government in Urban Development Department *vide* Government Order No.- टिपीएस-1820-614-प्र.क्र.-7-2021- नवि-13, dated 27th March, 2025, has been delegated the powers as per the provisions of section 154 of the said Act to the respective Assistant Director of Town Planning, Branch Office, Amravati, in order to carry out the process under the provisions of section 20(3) of the said Act regarding the draft Road Network Plans for the areas within the Regional Plan area;

And therefore, now, it is necessary to publish the draft Road Network Plans in the said area as per 'Schedule-A' attached to the said notice to hear the suggestions and objections from the public within the prescribed period of 30 days, therefore, the said notice is being published under the provisions of secion 20(3) of the said Act;

*SCHEDULE* -A

**Fringe Area Road Network and Included Villages**

| Sr. No. | Proposed Road Network plan | Distanc from jurisdiction of Municiple Corporation/ Municiple Council mentioned in Column B | Included Villages |
|---|---|---|---|
| (A) | (B) | (C) | (D) |
| 1 | Amravati Corporation | 2.00 K.m. | **Tq Amravati:-**<br>1) Kathora bu.(Part),2)Hirapur(Part), 3)Rewsa(Part), 4) Changapur, 5) Ramgaon(Part), 6) Nagapur(Part), 7) wadki (Part), 8) Borgaon Dharmade, 9) Wadgaon mahore, 10)wadura(Part), 11)Rajura(Part), 12) Masod (Part), 13)Sukli(Part), 14) Rasulpur(Part), 15) Wanarsi (Part), 16)Malkapur(Part), 17)Lontek(Part), 18) Chanduri(Part), 19)Pimpri 20)indla(Part), 21)Bhankheda Khu.(Part), 22)Madegaon 23)Takli Khu. 24) Wadad(Part), 25) Aliyabad(Part), 26)Masla27)Nimbhora Laye Bu. (Part), 28)Anjangaon bari(Part), 29) Govindpur(Part), 30)Morangana (Part), 31)Nandura Bu. (Part), 32)Degaon (Part), 33)Katamla (Part), 34) Nandgaon Peth (Part), 35)Sultanpur, 36)Devgiri, 37)Madhlabaad, 38)Warwad (Part), 39)Kamunja (Part),.<br>TqNandgaon Khandeshwar:-<br>1) Dabha(Part), 2) Pala(Part), 3) Durgapur(Part), 4) Nimbhora (Part).<br>TqBhatkulii:-<br>1) Borgaon(Part). |
| 2 | Achalpur Municiple Council | 1.00 K.m. | 1)Ambadkandari (Part), 2)Aurangpur (Part), 3) Dhotarkheda (Part), 4)Gaulkheda (Part), 5) Kandli (Part), 6) Khanjirpur (Part), 7)Khelbagad (Part), 8)Khelbari (Part), 9)Khelbhalerao (Part), 10) Kheldeomali (Part), 11) Khelmat (Part), 12)Wadura (Part), 13) Kheltapmali (Part), 14) Kheltekal (Part), 15) Kheltryambank narayan(Part), 16) Khojanpur (Part), 17) Kumbhi (Part), 18)Narayanpur (Part), 19) Narsala (Part), 20) Naubagh (Part), 21) Raypur (Part), 22) Khamgaon (Part), 23) Salebad (Part), 24) Shekapur (Part), 25) Virkhed (Part), 26) Nizampur (Part), 27) Rahimpur (Part),. |

SCHEDULE -A– *Contd.*

| (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|
| 3 | Dhamangaon Railway Muni-ciple Council | 1.00 K.m. | 1)Hirapur(Part), 2)Jalgaon Arvi(Part), 3)Dattapur 4) Nargawandi 5)Dattapur(Part), 6) Parsodi(Part), 7)Dhamangaon(Part), 8) Mirzapur(Part). |
| 4 | Chandur Bazar Municipal Council | 1.00 K.m. | 1) Abdulpur (Part), 2) Boraj (Part), 3) Nanori (Part), 4) Dilawalpur (Part), 5) Rashidpur (Part), 6) Jama-pur (Part), 7) Shirajgaon band (Part), 8) Pralahadpur (Part), 9) Parsoda (Part), 10) Imampur (Part). |
| 5 | Chandur Railway Municipal Council | 1.00 K.m. | 1) Manjarkhed (Part),, 2) Shivni (Part), 3) Songaon (Part), 4) Rajna(Part), 5) Tuljapur(Part), 6) Shirajga-on(Part), 7) Neknampur 8) Chandur Railway (Part). |
| 6 | Morshi Municipal Council | 1.00 K.m. | 1) Durgwada(Part), 2) Yerla(Part),, 3) sahadatpur (Part), 4) Manimpur 5) Kopra(Part), 6) Ahmadpur (Part), 7) Morshi (Part). |
| 7 | Daryapur Mu-nicipal Council | 1.00 K.m. | 1) Daryapur(Part), 2) Chandur(Part), 3) Kapsi(Part), 4)Peth Itbarpur(Part), 5) Jahanpur, 6) Thilori (Part), 7) Lodhipur, 8) Gaywadi(Part), 9) Ganeshpur, 10) babh-ali (Part), 11) Shiwar Bu. 12) Shiwar kh. 13) Banosa (Part), 14) Mustafapur(Part). |
| 8 | Warud Municipal Council | 1.00 K.m. | 1) Wai Bu. (Part), 2) Shendurjana ghat, 3) Malk-hed(Part), 4) Pardi(Part), 5) Raushankhed(Part), 6) Shirpur(Part), 7)Pimpalkhuta(Part), 8)Milanpur (Part), 9) Jarudh(Part), 10)Shapur(Part), 11) Mahapur (Part), 12) Temburkhed (Part), 13)Antarkhop(Part), 14)Bhandoli (Part), 15)Koyli(Part), 16)Dyawali(Part). |
| 9 | Shendur-janaghat Municipal Council | 1.00 K.m. | 1) Satnoor (Part),, 2)Khedi (Part),, 3) Jamatla (Part), 4) Malkhed (Part),, 5) Warud (Part), 6) Antarkhop (Part), 7) Tiwsa (Part), 8) Mokvihir (Part), 9) Wai Bu.(Part), 10) Raode (Part), 11), Pusli (Part). |
| 10 | Anjanga-on Surji Municipal Council | 1.00 K.m. | 1)Ahmadpur(Part), 2)Aiwajpur (Part),3)Ajitpur (Part), 4)Alipur (Part), 5) Anjangaon Surji(Part), 6)Khelhadol (Part), 7)Jethmalpur (Part), 8) Khel Babuji (Part), 9)Khelhadol (Part), 10)Khelhiraji (Part), 11)Khelkokat (Part), 12)Mohabbatpur (Part), 13)Shahapur (Part), 14)Surji (Part), 15)Takarkheda more (Part), 16)Shira-jgaon (Part), 17)Khelhatol (Part). |

SCHEDULE -A–*Contd.*

| (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|
| 11 | Dharni Nagar Panchayat | 0.50 K.m. | 1)Tingriya(Part), 2)Kusumkot Bu.(Part), 3) Kusumkot kh.(Part), 4) Mandwa(Part), 5) Baspani (Part), 6) Talai(Part), 7) Takarkheda(Part). |
| 12 | Bhatkuli Nagar Panchayat | 0.50 K.m. | 1) Nauthal Kh. (Part),, 2)Borkhadi Kh. (Part), 3) Hartodi(Part), 4)Hartala(Part), 5)Sayat(Part), 6) Chakur(Part), 7)Ganori(Part), 8)Gaulkhed Bu.(Part), 9) Nimbha (Part), 10)Vasewadi (Part), 11)Bonewadi(Part), 12)Sarbulandpur (Part), 13)Thetkhed(Part), 14) Govindpur, 15)Janewadi(Part), 16)Checharwadi (Part), 17) Dholewadi (Part),18) Krushnapur(Part), 19)Dalalkhed (Part). |
| 13 | Nandgaon Khandeshwar Nagar Panchayat | 0.50 K.m. | 1) Shirpur(Part), 2)Mokhad(Part), 3) Mirzapur (Part), 4)Satargaon (Part), 5)Kanjhar (Part), 6)Shapur(Part), 7)Bachcharpur (Part), 8)Fubgaon (Part), 9)Shivni (Part), 10)Sangrampur (Part), 11)Pahur (Part), 12)Dharwadi (Part), 13)Chinchol (Part), 14)Yenas (Part). |
| 14 | Tiwsa Nagar Panchayat | 0.50 K.m. | 1)Chandur (Part),, 2)Isapur (Part),, 3)Mamdapur (Part), 4)Katsur (Part), 5)Satargaon (Part), 6)Sarsi (Part), 7) Vinchori (Part), 8)Talegaon(Part), 9)Shendurjana Bu. (Part), 10)dehni (Part), 11)Nimbhora(Part), 12) Survadi Kh. (Part), 13)Survadi Bu.(Part), |
| 15 | Pulgaon Municipal Council, Dist Wardha. Area under Taluka Dhamangaon, Dist. Amravati | 1.00 K.m. | 1) Giroli (Part), 2) Vitala (Part), 3) Vayankanath (Part), |

If any person have any suggestion / objection in accordance with the Draft Road Network Plans, they should send these suggestion / objection in writing to the office of the Assistant Director of Town Planning, Branch office, Amravati within the period of 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion / objection received by the office of Assistant Director of Town Planning, Branch Office, Amravati within 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* will be considered;

The Draft Road Network Plans are available for the public inspection during office hours at the office of the Assistant Director, Town Planning, Branch Office, Amravati at address Assistant Director, Town Planning, Branch Office, Tatte Building, Dod Compound, Camp, Amravati. The copies of the said draft Road Network plans and its particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Assistant Director of Town Planning, Branch Office, Amravati.

NAMRATA BOBDE,
Authorized Officer And
Assistant Director of
Town Planing,
Branch Office, Amravati.

Amravati :
Dated the 20th May 2025.

१०

**बुधवार, जून ४, २०२५/ज्येष्ठ १४, शके १९४७**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये**

**शुद्धीपत्र**

क्रमांक नपपां-न.र.वि.- प्रा.वि.यो.-पांढरकवडा - ३५३-२०२५.—

पांढरकवडा नगर परिषदेने नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४)अन्वये दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) भाग एक-अ अमरावती विभागीय पुरवणी मध्ये पा. क्र. १-४, अ.क्र. २९ वर पांढरकवडा शहराच्या प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजना ( सु. २ + वा.ह.) मधील फेरबदल/बदलांच्या सूचीमध्ये खालील दर्शविल्या तक्त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे. सदर प्रसिद्ध अधिसूचना मध्ये

खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.—

तक्ता

| अ. क्र. | फेरबदल क्रमांक | च्या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | एम-८ | मौजा पांढरकवडा, सर्व्हे नं. २० / २ बी वरील २४.० मी. रुंद वि. यो. रस्त्याचे आरक्षण, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ अन्वये आदेश क्र. डी. टी. पी.-वियो-पांढरकवडा (सु.)-कलम १२७ (२)-आदेश टीपीव्ही-६, ४८८०, दिनांक ६ सप्टेंबर, २०२४ नुसार व्यपगत झाले असून वि. यो. नकाशावर दर्शविण्यात आले आहे. | मौजा पांढरकवडा, सर्व्हे नं. २०/२ बी वरील २४.० मी. रुंद वि.यो. रस्त्याचे आरक्षण, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ अन्वये आदेश क्र. डी.टी.पी.-वियो-पांढरकवडा (सु.) कलम १२७(२)-आदेश-टीपीव्ही-६-४८८०, दिनांक ६ सप्टेंबर, २०२४ नुसार (०.२०५० हे.) उत्तर-दक्षिण (पूर्व बाजूकडील) भागशः व्यपगत झाले असून वि. यो. नकाशावर दर्शविण्यात आले आहे. |

**ज्ञानेश सोनवाने,**

पांढरकवडा : प्रशासक तथा मुख्याधिकारी,
दिनांक २ जून, २०२५. नगर परिषद, पांढरकवडा.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३.

BY ADMINISTRATOR AND CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 UNDER SECTION 28*(4)*

*CORRIGENDUM*

No.MCP-TPD-Pandharkawad-353-2025.–

Pandharkawada Municipal Council being the Planning Authority as per Section 28*(4)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 has published the list of Modification/ Changes in the Draft Development Plan ( 2nd Revision + AA) *vide* Gazette Notification Maharashtra Government Gazette Extra Ordinary Part 1-A Amravati Divisional Supplement, dated 10th October, 2024 on Page No. 1-4, Sr. No. 29. In the said Publication corrections as stated below are made. Read the notification with below corrections accordingly.–

*TABLE*

| Sr. No. | Modification No. | *Instead of* | *Read as* |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | M-8 | Reservation of 24.0 m. DP on S.No. 20/2B lapsed u/s 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* Order No. D.T.P.-D.P.Pandharkawada(R)/ Sec.-127(2)-Notification-TPV-VI-4880, dated 06th September 2024 is shown on the plan | Partly lapsed North-South (Eastern side) 24 M. D.P. Road u/s 127(2) *vide* Order No. D.T.P./D.P. Pandharkawada(R)/Sec-127(2)-Order-TPV -VI/4880, dated 6th September, 2024 (Area 0.2050 H.A.) as shown on the plan. |

DNYANESH SONWANE,

Pandharkawada: Administrator & Chief Officer,
Dated the 2nd June, 2025. Municipal Council, Pandharkawada.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.